# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ Email Id :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१६/आस्था/से.नि.कंत्राटी भरती /१०९८/२०२१
दिनांक - १६/०३/२०२१

**प्रती,**
**मा.सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे**

विषय :- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे मधून कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरणेबाबतची जाहिरात (शुद्धीपत्रक) आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे बाबत........

**संदर्भ** :-सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील,पत्र जा.क्र. ससंनि-११२०/प्र.क्र.११३/१३-स दि.०५ नोव्हेंबर,२०२०

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या आस्थापनेवर,महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण – २७१५ /प्र.क्र.१००/१३ दिनानक .१७.१२.२०१६ मधील नमूद तरतुदी , अटी व शर्ती ,नुसार सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी , यांचे मधून कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरणेबाबत जाहिरात देण्यात आलेली होती,सदर जाहिराती द्वारे अर्ज स्वीकारण्याची मुदत दि.१५.०४.२०२१ पर्यंत वाढविण्यासाठी पून्हा शुद्धीपत्रक देण्यात आलेले आहे.

**सोबत जोडण्यात आलेला जाहिरातिचा नमुना आपल्या अधिकृत** http:// www.sahakarayuakta.com **वेबसाईटवर प्रसिद्ध करणेबाबत विनंती आहे.**

16/03/2021

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे

सोबत - जाहिरात नमुना सॉफ्ट व हार्ड कॉपी.

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत,५बी. जे.रोड तळ मजला, पुणे-४११००१**
फोन नं - (०२०) २६०५०६४१ Email id :- sceapune@gmail.com

---

**कंत्राटी पद भरतीची जाहिरात(शुद्धीपत्रक)क्र. /२०२१**

सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे, प्राधिकरणात कंत्राटी पध्दतीने पद भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील,निर्णय क्रमांक :संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन विविध पदांसाठी दि. १३.०२.२०२१ रोजी **लोकसत्ता पुणे व प्रभात पुणे** वर्तमान पत्रांत प्रसिद्ध जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आलेले असून त्याची मुदत **दि. ०१.०३.२०२१ पर्यंत अर्ज सादर करावेत असे होते, सदर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.१५.०४.२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.इतर तपशिलात कोणताही बदल नाही.**

विस्तृत जाहिरात,अर्जाचा विहित नमुना, अटी व शर्ती सहकार आयुक्त व निबंधक यांचे वेबसाईट http://www.sahakarayuakta.com वर देण्यात आला आहे.

सही/-
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण म.रा.पुणे

2. **भत्ते** :- दि.17.12.2016 शासन निर्णयामधील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक परिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त 25% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

3. **करार पध्दतीने** नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या परिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या ०१०-कंत्राटी सेवा या लेखाशीर्ष/बाबी खाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात येईल.

**ड ) इतर अटी व शर्ती :-**

१. (i) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाने/ सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

(ii) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

(iii) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

(iv) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

(v) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

(vi) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

2. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत. (उदा.आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकार देता येणार नाहीत.)

3. कंत्राटी तत्वावरील नियुक्ति अधिकारी/कर्मचारी यांना नैमीतिक रजे व्यतिरिक्त इतर कोणत्याही रजा अनुद्येय रहाणार नाहीत

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे